तज्ञ समिती
द्वारा “प्रिया” ५ वा मजला
वरळी सी फेस
मुंबई ४०० ०३०

मानानीय श्री.अशोक चव्हाण
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

धारावी विकास प्रकल्प

माननीय मुख्यमंत्री,
सादर नमस्कार.

धारावी विकास प्रकल्पाविषयी आमचे तीव्र आक्षेप नोंदवणाऱ्या पत्रांना आपल्याकडून काहीच प्रतिसाद न मिळाल्यामुळे आम्ही हे पत्र अनावृत पत्राच्या स्वरूपात पाठवून ते इतरांनाही वाचण्यासाठी खुले करीत आहोत.

धारावी विकास प्रकल्पाचा आराखडा बनवून तो अमलात आणण्याविषयी सल्ला देण्यासाठी तज्ञांची समिती म्हणून आम्हाला नेमल्यापासून आम्ही प्रकल्पाचे सल्लागार व व्यवस्थापक मुकेश मेहता आणि बऱ्याच इच्छुक विकासकांची सादरीकरणे बघितली. ती बघून आम्ही खालील निष्कर्ष काढले आहेत.

१. धारावी विकास प्रकल्प हा एक जमीन-तथा भूखंड हडपण्याचा चलाख मार्गच आहे. वर्षानुवर्षे सरकारने शहराच्या निरनिराळया भागांतील लोकांना धारावीत राहणे भाग पाडले, परंतु तिथल्या रहिवासाचे उचित कायदेशीर हक्क त्यांना दिले नाहीत. तिथे वसवल्याबरोबर असे कायद्याचे संरक्षण मिळणे हा त्या रहिवाशांचा अधिकार होता, पण तो मुद्दाम डावलण्यात आला.
२. वास्तविक ही जमीन त्यांना त्याच वेळी विशिष्ट कालखंडासाठी उदा. ९९ वर्षे भाडयाने, त्यावेळच्या अटी व दरांनुसार, दिली गेली असे आता समजले पाहिजे.
३. धाराविच्या रहिवाशांनी नुसते घरसंसारच नव्हेत तर अनेक पोटापाण्याचे उद्योग - व्यवसाय-धंदे प्रस्थापित केले आहेत. राहण्याची व कामाची जागा शेजारी-शेजारी असल्यामुळे हे उद्योग व्यवसाय अतिशय कार्यक्षम होऊन भरभराटीला आले आहेत. धारावीच्या प्रस्तुत विकासाच्या आराखडयात मात्र

हया उद्योगांना स्थानच दिलेले नाही.

४. धारावीच्या रहिवाशांना घरांची फुकटात पुनर्बांधणी व नवीन जागेचा कायदेशीर ताबा देऊ केला गेला आहे. परंतु त्याच्या बदल्यात अ) त्यांना सध्या आहे त्याच्या ४७% - म्हणजे निम्म्यापेक्षाही कमी - जागेत स्थलांतर करावे लागेल, आणि ब)त्यांचे उपजीविकेचे साधन मात्र नष्ट होईल.

५. आहे तिथेच राहायचे असल्यास त्यांना त्याच ठिकाणी, परंतु सध्या ते वापरीत असलेल्या एकूण जमिनीच्या निम्म्यापेक्षा कमी जमिनीवर, पक्की घरे बांधून देण्यात येतील. हयामुळे मोकळया झालेल्या उर्वरित जमिनीचा व्यापारी तत्वावर वापर होईल आणि त्यातून सरकार आणि विकासक हयांना अफाट फायदा होईल. अशा रितीने ही योजना केवळ पैशाच्या लोभापोटी आणि रहिवाशांचे हित अजिबात लक्षात न घेता राबवली जाणार आहे, हे उघड आहे.

६. धरावीत लोकसंख्येची घनता सध्याच जगात सर्वात जास्त आहे. आत्ताच्या रहिवाशांना ४७% जागेत कोंबून उरलेल्या जागेत आणखी रहिवाशांची भर घातल्यास ही घनता व्यावहारिकतेच्या पलिकडे जाईल.

७. धारावी ही एक समृद्ध वसाहत आहे. अनेक गैरसोयी सहन करीत पण एकमेकांशी सहकार्य करून गुण्यागोविंदाने इथले लोक राहतात. सरकारची जवळजवळ काहीच मदत नसताना त्यांनी आपले आयुष्य उभे केले आह. मूलभूत सुविधांचा दुष्काळच असताना देखील त्यांनी उद्योगधंदे उभारून ते ज्या यशस्वी तऱ्हेने चालवले आहेत त्यातून त्यांची चिकाटी व उद्योजकता दिसून येते. देशाच्या अर्थव्यवस्थेला महत्वाचा हातभार लागेल अशा तऱ्हेने शहरी विकास कसा करावा हयाचा उत्तम धडा धारावी देऊ शकेल.

८. आमचे असे ठाम मत आहे की धारावीचा विकास करताना नफा-फायदा - मग तो सरकारसाठी असो अथवा विकासकांसाठी - करण्याची कल्पना सोडून देऊन धारावीच्या रहिवाशांच्या हितावरच लक्ष केंद्रित करावयास हवे.गरज आहे ती त्यांना मूलभूत सुविधा देण्याची. हयात पाणी पुरवठा, सांडपाणी व कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि वाहतूक साधने (ज्यांयोगे खाजगी मोटारींची वाहतूक कमीत कमी होईल) हयांचा मुख्यत्वे अंतर्भाव असावा. पुनर्वसनासाठी एक सर्वसमावेशक आराखडा-वजा-योजना आखून त्यानुसार रहिवाशांना स्वतःचेच पुनर्वसन-वजा-विकास करण्यास उद्युक्त केले पाहिजे. निरनिराळया भागांचे रहिवासी त्यांच्या पद्धतीने, त्यांना हवे तेव्हा, आपले पुनर्वसन करू शकतील. फक्त ते आखून दिलेल्या नियम व निकषांनुसारच असले पाहिजे आणि ते केल्यावरच जमिनीचे कायदेशीर हक्क त्यांना देण्यात येतील, अशा अटी घालता येतील.

९. वरील सगळयाचा मतितार्थ एवढाच की, धारावीचा पुनर्विकास करण्यासाठी

तिथल्या रहिवाशांची इच्छा आणि पसंती जमेस धरणाऱ्या एका वेगळया पर्यायाची नितांत आवश्यकता आहे.

आपले विश्वासू,

| | |
|---|---|
| द.म.सुकथनकर | सुंदर बुर्रा |
| ए.जॉकिन | विद्याधर फाटक |
| चंद्रशेखर प्रभू | शिरीष पटेल |
| नीरा आडारकर | अरविंद आडारकर |
| शीला पटेल | अनिरूद्ध पॉल |